# ग्रामीण कृषी मौसम सेवा,

## विभागीय कृषी संशोधन केंद्र,शेंडा पार्क, कोल्हापूर (महाराष्ट्र)

### हवामानाच्या अंदाजावर आधारित शेतीविषयक सल्ला – सातारा

| हवामान घटक | हवामान अंदाज | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १६.१०.२०१९ | १७.१०.२०१९ | १८.१०.२०१९ | १९.१०.२०१९ | २०.१०.२०१९ |
| पाऊस (मि.मी.) | ४ | ८ | २० | १५ | २१ |
| कमाल तापमान (अंश सेल्सिअस) | ३१ | ३० | ३० | २८ | २९ |
| किमान तापमान (अंश सेल्सिअस) | २२ | २२ | २१ | २१ | २१ |
| ढगांचे अच्छादन | ५ | ६ | ८ | ८ | ७ |
| कमाल सापेक्ष आर्द्रता (टक्के) | ८५ | ९० | ८८ | ९१ | ९४ |
| किमान सापेक्ष आर्द्रता (टक्के) | ४५ | ५८ | ६३ | ७४ | ६८ |
| वाऱ्याचा वेग (कि.मी. प्रती तास) | १० | १० | ११ | ६ | ७ |
| वाऱ्याची दिशा | पूर्व.आग्नेय | पूर्व.आग्नेय | पूर्व.आग्नेय | पूर्व.आग्नेय | आग्नेय |

**सातारा जिल्ह्यासाठी भारतीय हवामान विभाग पुणे यांचेकडून प्राप्त झालेला अंदाज-**

भारतीय हवामान विभाग पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी दिनांक १६ ते २० ऑक्टोबर दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान २८.० ते ३१.० अंश सेल्सिअस सप्टेंबर दरम्यान तर किमान तापमान २१ ते २२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वा-याचा वेग ताशी ०६ ते ११ (कि.मी.) दरम्यान राहील.

**इशारा : सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी दिनांक १६ ते २० ऑक्टोबर दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.**

### हवामान अंदाजावर आधारित शेती विषयक सल्ला

| पिक | वाढीची अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| रब्बी व्यवस्थापन | | ➢**पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.**<br>➢**अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव मका पिकाबरोबरच शेतामधील इतर पिकांवर होऊ शकतो त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतातील पिकांची दररोज पाहणी करावी.**<br>➢**रबी हंगामामध्ये गहू व हरभरा हि पिके घेण्यासाठी जमिनीची पूर्वमशागत सुरु करावी.** |
| भात | दाणे भरणे ते पक्वता | ➢ भात खाचरामध्ये पाण्याची पातळी दाणे भरण्याच्या अवस्थेत १० से.मी. ठेवावी.<br>➢ भाताच्या हळव्या जाती पक्व झाल्या असल्यास काढणी करून घ्यावी. भाताच्या लोंब्यामधील ८० ते ९० % दाने पक्व झाल्याचे दिसताच वैभव विळ्याच्या सहाय्याने पिकाची कापणी जमिनीलगत करावी. |
| मका | शाखीय वाढ | **अमेरिकन लष्करी आळीचे नियंत्रण :**<br>➢ **रासायनिक नियंत्रण: १.** आळीच्या वाढीच्या सुरवातीच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५%यांची ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा २.** थायमेथोक्झाम १२.६ %+ लॅम्डा सायहेलोथ्रीन ९.५ % झेड सी. या मिश्र किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा ३.** क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ % एस.सी. या किटकनाशकाची ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी |
| रब्बी ज्वारी | पेरणी | ➢ रब्बी ज्वारीची पेरणी करावी त्यासाठी फुले माऊली, फुले सुचित्रा, फुले अनुराधा, फुले वसुधा, फुले यशोधा, फुले उत्तरा या वाणांची निवड करावी. |
| हरभरा | पेरणी | ➢ कोरडवाहू क्षेत्रामध्ये जमिनीतील ओल कमी होण्यापूर्वी पेरणी करावी त्यासाठी विजय, दिग्विजय आणि फुले विक्रम हे वाण वापरावेत.<br>➢ पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोग्रामाची बीजप्रक्रिया करावी, त्यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणामध्ये मिसळून चोळावे व नंतर तासभर सावलीत सुकवून मग पेरणी करावी. |
| ऊस | वाढीची | ➢ पाण्याच्या उपलब्धतेनुसार पूर्व हंगामी ऊस लागवड सुरु करावी लागवडीसाठी को.८६०३२(नीरा), को.एम.०२६५(फुले २६५), एम.एस.१०००१ (फुले १०००१),को.९४०१२(फुले सावित्री), को.सी.६७१(वसंत-१) या जातींची निवड करावी.<br>➢ हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी फिप्रोनील ०.३ % दाणेदार किटकनाशक ३३ किलो प्रती हेक्टर या प्रमाणात पसरावे. |
| भुईमुग | पक्वता | ➢ भुईमुग पीक पक्व झाल्यास पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. अश्या पक्व झालेल्या पिकाची काढणी करून घ्यावी. मध्यम पावसाची शक्यता असल्यामुळे काढणी केलेले पिक सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावे. |
| सोयाबीन | पक्वता | ➢ शेंगांचा रंग पिवळट तांबुस झाल्यानंतर, जातीच्या पक्वतेच्या कालावधीनुसार ९० ते ११० दिवसांत काढणी करावी. पीक काढणीस उशीर झाल्यास शेंग फुटण्यास सुरुवात होते. पिकाची कापणी धारदार विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत करावी. मध्यम पावसाची शक्यता असल्यामुळे काढणी केलेले पिक सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| भाजीपाला | बटाटा | ➢ रब्बी हंगामासाठी बटाटा या पिकाची लागवड करावी. लागवडीसाठी कुफरी ज्योती, कुफरी लवकर, कुफरी सिंधुरी, कुफरी सूर्या ई. जातींचा वापर करावा. |
| | वाटाणा | ➢ रब्बी हंगामासाठी वाटाणा या पिकाची लागवड करावी. लागवडीसाठी बोनव्हिला, अरकेल, फुले प्रिया ई. वाणांचा वापर करावा. |
| कांदा | लागवड (रांगडा) | ➢ रांगडा कांद्याची लागवड ऑक्टोबर महिन्यात करावी त्यासाठी बसवंत ७८०, फुले समर्थ, एन -२-४-१ या जातींचा वापर करावा. |
| जनावरे | वाढीची | ➢ पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |

स्थळ : कोल्हापूर
दिनांक १५.१०.२०१९

सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषी संशोधन केंद्र,
शेंडा पार्क, कोल्हापूर